- प्रेस नोट - दि.०६/०१/२०२०.

| | अँन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) शिवराज अनंत चव्हाण, वय-३१ वर्षे,<br>परवाना अधिकारी, मत्स्य विभाग मालवण वर्ग-३<br>२) प्रदिप लक्ष्मण वस्त, वय- ५३ वर्षे<br>प्रशिक्षण अधिकारी मत्सविभाग मालवण अतिरीक्त पद्भार प्रभारी सहाय्यक आयुक्त मत्स विभाग मालवण वर्ग- २ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/-रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २,००,०००/-रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार श्री. सतिश रामचंद्र आचरेकर, रा.मेंढा, ता. मालवण यांचा मासेमारीचा व्यवसाय असुन त्यांनी “दिनांक ०३/०१/२०२० रोजी रात्री माझी विघ्नहर्ता नावाची बोट फीशरीज अधिकारी चव्हाण यांना समुद्रामध्ये लाईट चालु असलेस्थितीत नांगरावरती आढळुन आली. सदर बोटीवर कारवाई न करण्याकरीता त्यांनी माझेकडे ५,००,०००/- रू. ची मागणी करून त्या अनुषंगाने दि. ०४/०१/२०१९ रोजी फीशरीज अधिकरी श्री. वस्त व आपली मत्स्यविभाग मालवण कार्यालयात भेट घेणेबाबत सांगितले आहे” अशा स्वरूपाची लेखी तक्रार दिनांक ०४/०१/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग कडे केली होती.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/०१/२०२० रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता लोकसेवक चव्हाण, परवाना अधिकारी, मत्स्यविभाग मालवण, जि. सिंधुदुर्ग व लोकसेवक वस्त, प्रभारी सहा.आयुक्त, मत्स्यविभाग मालवण, जि.सिंधुदुर्ग यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे दि. ०३/०१/२०२० रोजी रात्री पकडलेल्या विघ्नहर्ता बोटीवर कारवाई न करण्यासाठी व दोन्ही बोटींवर पुढील तीन महीने कारवाई न करणेकरीता ५,००,०००/- रू. लाचेची मागणी करून त्यापैकी २,००,०००/- रू. दोन तासात घेवून येण्यास सांगितले असल्याचे पडताळणी कारवाईत निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने लोकसेवक चव्हाण व लोकसेवक वस्त यांचेवर दि. ०४/०१/२०२० रोजी सहा. आयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग, मालवण, जि. सिंधुदुर्ग कार्यालयात लाचेचा सापळा आजमाविला असता लोकसेवक चव्हाण व लोकसेवक वस्त यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रुपये २,००,०००/- स्विकारलेवरून १६.५६ वा. रंगेहाथ पकडण्यात आले.<br>वरील कारवाई श्री.दिपक कांबळे, पोलीस उपअधीक्षक, असीबी सिंधुदूर्ग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. नितीन कुंभार यांचेकडून करण्यात आलेली आहे. |

अँन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- अँन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांचे कार्यालय, कुडाळ,ता.कुडाळ**
**टोल फ्री नंबर:-१०६४,**
**दुरध्वनी क्र.०२३६२-२२२२८९**

(नितीन कुंभार)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग

Scanned by CamScanner